# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 14 September 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १३ सप्टेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- कांदा निर्यातीसाठी किमान मूल्याची अट रद्द–गहू साठवणुकीच्या मर्यादेतही कपात
- मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत शेतकरी नोंदणीसाठीच्या संकेतस्थळाचं लोकार्पण
- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज धाराशिव तसंच लातूर दौऱ्यावर

आणि

- आरक्षणाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात भाजपचं राज्यव्यापी आंदोलन

****

कांदा निर्यातीसाठीची किमान मूल्याची अट केंद्र सरकारनं रद्द केली आहे. कांदा निर्यातीवर नियंत्रणासाठी प्रतिटन साडे पाचशे अमेरिकी डॉलर मूल्य मर्यादा होती, ही मर्यादा हटवल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जागतिक बाजारातल्या संधीचा लाभ घेता येणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, गव्हाची साठेबाजी तसंच दरवाढ रोखण्यासाठी वितरण व्यवस्थेतले घाऊक तसंच मोठ्या विक्रेत्यांसाठी साठवणुकीची मर्यादा तीन हजार मेट्रिक टनांवरून दोन हजार मेट्रिक टन करण्यात आली आहे. पुढच्या ३१ मार्चपर्यंत ही मर्यादा लागू असेल.

****

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या संकेतस्थळाचं लोकार्पण ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल मुंबईत झालं. सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली